साप्ताहिक चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ११
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in


■ सोमवार, दि. २७ एप्रिल ते ३ मे २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

# परदेशींचा प्रताप; साहित्यक्षेत्राला ताप!

**नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत पारदर्शकता नव्हती, त्यात अनेक गैरप्रकार झाले, भारतीय जनता पक्षाने ही निवडणूक हातात घेऊन साहित्यातील या मातृसंस्थेचा राजकीय आखाडा केला, या अनुषंगाने साप्ताहिक 'चपराक'ने १६ मार्चच्या अंकात सविस्तर वृत्तांत दिला होता. 'चोराच्या मनात पोलीस' या म्हणीप्रमाणे हा वृत्तांत आपल्यावरच आहे, असा समज करून घेत सरकारनियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांनी 'चपराक'ला तब्बल वीस कोटी रुपयांच्या अब्रू नुकसानीची नोटीस पाठवली आहे. कोटीच्या कोटी उड्डाणे घेणाऱ्यांसाठी वीस कोटी ही रक्कम कदाचित नगण्य असेल पण त्यांच्या अब्रूची किंमत ठरवत त्यांनी जी दडपशाही सुरू केली आहे ती 'चोराच्या उलट्या बोंबा' या पठडीतील आहे.**

प्रताप परदेशी हे ज्येष्ठ विधिज्ञ आहेत. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचीही केस त्यांनी लढवली होती. त्यामुळे या क्षेत्रात त्यांचा सकारात्मक दबदबा आहे. असे असूनही ही निवडणूक त्यांच्या हातात राहिली नव्हती. वाढत्या राजकीय हस्तक्षेपामुळे असेल पण आपण सत्तेच्या नादी लागून सत्याची कास धरू शकत नाही, याचं त्यांना नैराश्य आलं असावं. त्यामुळेच अनेक वृत्तपत्रांनी परिषदेत संघशक्तीचा विजय, साहित्य परिषदेत हिंदुत्ववादी विचारधारेचा शिरकाव अशा स्वरूपाच्या बातम्या करूनही त्यांना काहीच करता आले नव्हते. निकालानंतर लगोलग भाजप नेते राजेश पांडे साहित्य परिषदेत आले, विजयी उमेदवारांना त्यांनी पेढे भरवले. 'राजेश पांडे आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा स्वरूपाच्या घोषणा दिल्या गेल्या. विजयी उमेदवारांनी निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे आदींनी योगेश सोमण आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सत्कार केले. भाजपच्या सर्व प्रवक्त्यांनी, काही संघ स्वयंसेवकांनी समाजमाध्यमावर अभिनंदनाच्या पोस्ट टाकल्या. खरं तर सोमण आणि त्यांच्या चमूचे साहित्य क्षेत्राकडून जोरदार स्वागत व्हायला हवे होते; मात्र सर्वत्र फक्त राजकीय कौतुकसोहळे सुरू होते! असे असूनही 'साहित्य परिषदेत भाजप विजयी' असे म्हटल्याने निवडणूक निर्णय अधिकारी प्रताप परदेशी यांच्या बुडाला मिर्च्या का झोंबाव्यात? एखाद्याला 'भाजपवाला' म्हणणं ही सध्याच्या पार्श्वभूमीवर शिवी झालीय का? त्यासाठी त्यांना अशा अब्रू नुकसानीच्या नोटीसा पाठवाव्या लागतात का? कधीकधी सत्य हे समुद्राच्या तळाशी खोलवर जाऊन बसलेले असते पण ते वर उफाळून येतेच हा निसर्गनियम त्यांना ज्ञात नाही का?

निवडणुकीतील अनेक गैरप्रकार पाहून उमेदवार असलेल्या विनोद कुलकर्णी यांनी आरोप केला की, 'निवडणूक निर्णय अधिकारी प्रताप परदेशी हे सरकारला विकलेले गद्दार निघाले. स्वतः दत्तगुरूचे भक्त असल्याचा आव आणत त्यांनी न्यायप्रक्रियेला काळिमा फासला...' त्यांच्या या आरोपाला उत्तर देण्याऐवजी परदेशींनी 'चपराक'ला थेट नोटीसच पाठवली. बरं, एका नोटीसीवर त्यांचं समाधान झालं तर शपथ! यांनी नोटीसींचं सत्रच सुरू केलं आहे. 'भगवान श्री दत्तात्रेयांच्या नावाचा अनावश्यक, अवमानकारक व विकृत संदर्भात वापर केला आहे. त्यामुळे धार्मिक श्रद्धा, भावना व आध्यात्मिक विश्वासांना गंभीर धक्का बसला आहे,' असं म्हणत ते वेगवेगळ्या माणसांना, वेगवेगळ्या ठिकाणाहून नोटीसी पाठवायला उद्युक्त करत आहेत.



अरे चोंग्या, हा महाराष्ट्र आचार्य अत्र्यांचा आहे, ग. वा. बेहेरे, पु. भा. भावे, बाळासाहेब ठाकरेंचा आहे. 'सत्य हे सौंदर्य आहे, त्या सौंदर्यावर प्रेम करा' असे सांगणाऱ्या तमाम सत्यप्रेमींचा आहे. मूठभर मावळ्यांना हाताशी धरून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज आमचे

**संपादकीय** — घनश्याम पाटील, ७०५७२९२०९२

आदर्श आहेत. या आणि अशा सगळ्या महापुरुषांचा आदर्श ठेवून, तात्त्विक भूमिका घेत लढणारे आमच्यासारखे लोक तुझ्यासारख्या भुक्कड लोकांच्या नोटीसींना भीक घालतील का?

'चपराक'ने जी भूमिका घेतली ती सद्भावनेने, जनहितार्थ आणि निवडणुकीच्या सार्वजनिक प्रक्रियेवर आधारित होती. त्यात व्यक्तिशः ॲड. प्रताप वसंतसिंह परदेशी यांच्या चारित्र्यावर, त्यांच्या आयुष्यावर कोणतीही टिप्पणी केली नाही. निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता, निष्पक्षता आणि राजकीय हस्तक्षेप यावर आम्ही केलेली टीका भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३५६च्या अपवाद क्रमांक २ आणि ३ अंतर्गत पूर्णपणे संरक्षित आहे. त्यातील आरोपांना उत्तरे देण्याऐवजी परदेशी यांनी 'चोराच्या उलट्या बोंबा' याप्रमाणे आम्हाला नोटीसा पाठवून मनस्ताप देण्याचा उद्योग सुरू केला आहे. चतुरस्र, परखड, रास्त आणि कर्तव्यदक्ष हीच आद्याक्षरे घेऊन 'चपराक'चा जन्म झालेला असल्याने परदेशींचा साहित्य क्षेत्राला होणारा हा ताप आम्ही आनंदाने सहन करू आणि ही दडपशाही झुगारून लावू!

हिंदुत्व आमच्या रक्तात आहे. आमच्या धार्मिक निष्ठा प्रबळ आहेत. त्यात कुणाविषयी द्वेष, आकस नाही. कसलीही कर्मकांडं नाहीत. देव, देश आणि धर्मावरील अढळ श्रद्धा हेच तर आमचं बलस्थान आहे. त्यामुळे प्रताप परदेशीसारख्या वैफल्यग्रस्त आणि ढोंगी माणसाने 'आम्ही दत्तसंप्रदायाचा अपमान केला' असा आरोप करण्यापूर्वी स्वतःची प्रतिमा आरशात बघून घ्यावी. 'ॲड. प्रताप परदेशी यांच्यावर राजकीय दबाव होता. मुख्यमंत्र्यांनी राजेश पांडे, चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांना सांगितलं की, काहीही करून साहित्य परिषद आपल्याकडे आलीच पाहिजे नाही तर गाठ माझ्याशी आहे, अशी धमकी दिली,' असे काही आरोप आम्ही केलेत का? किंवा 'परदेशी हे भल्या पहाटे काही अधिकाऱ्यांना, वेगवेगळ्या क्षेत्रातील बड्या हस्तींना दत्तमंदिरात दर्शनाला बोलावतात. गर्दी टाळून थेट त्यांच्या हस्ते पूजा करतात, त्यांना प्रसाद देऊन त्यांचा सन्मान करतात आणि इथे आपला कसा वट आहे असा आविर्भाव आणत त्यांच्या धार्मिक भावना कुरवाळतात. त्यातून काही कामेही साध्य करून घेतात' असे काही बेछूट आरोप केलेत का? 'साहित्य परिषदेचे निवडणूक निर्णय



ॲड. प्रताप वसंतसिंह परदेशी

अधिकारी म्हणून काम करताना तोंडात सतत अर्वाच्य शिव्या ठेवतात, 'साहित्य परिषद भोसड्यात गेली', असे म्हणत या संस्थेची बदनामी करतात, त्याचा व्हिडिओही संबंधितांकडे आहे,' असा दावा आम्ही केलाय का? काही लोक तुमच्याविषयी असे बोलत असले तरी त्यात तथ्य नसावे; असेच आम्हाला वाटते! त्यामुळे आम्ही प्रताप परदेशी यांच्यावर वैयक्तिक आरोप न करता निवडणूक प्रक्रियेवरच भाष्य केले आहे. त्यातही श्री दत्तगुरूंचा किंवा कुणाचाही अवमान करण्याचा विचार आमच्या मनास स्पर्श सुद्धा करू शकत नाही. मग 'मी नाही त्यातली, कडी लावा आतली' या वृत्तीने परदेशी हा विषय पुढे का दामटत आहेत? साहित्य परिषदेसंदर्भात वृत्तांत देताना आम्ही कोणतीही आणि कुणाविषयीही दुर्भावना बाळगली नव्हती. जनतेला सत्य सांगणे हेच तर माध्यमांचे कर्तव्य आहे. अतिशय सद्भवनेने आम्ही ते पार पाडले आहे. पत्रकारितेचे घटनात्मक कर्तव्य पार पाडताना आम्ही आमचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य वापरले आहे. तरीही ॲड. प्रताप परदेशी नोटीस-नोटीस खेळत कायद्याचाच खेळखंडोबा करत आहेत. आम्हाला मनस्ताप देत आमच्यावर मानसिक दबाव आणण्याचा त्यांचा हा प्रयत्न हे सध्याच्या तकलादू व्यवस्थेचे प्रतीक आहे.

हा लेख लिहित असतानाच परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण यांची नाशिकहून एक बातमी आली आहे. सार्वजनिक वाचनालय नाशिक आणि इतर काही संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार घेण्यात आला. त्यावेळी बोलताना सोमण म्हणाले, 'पदभार स्वीकारण्यापूर्वीच तारीख न टाकलेला राजीनामा योग्य व्यक्तिकडे देऊन ठेवला आहे...' त्यांच्या या विधानातूनच त्यांना कसलाही कणा नसल्याचे सिद्ध होते. साहित्य परिषदेच्या बाहेर आता भारतीय जनता पक्षाच्या विभागीय कार्यालयाचा फलक लागला आणि तिथे खेड्यापाड्यातील लिहिणाऱ्या हातांना प्रवेश डावलण्यात आला तर ते पाप फक्त आणि फक्त प्रताप परदेशी यांच्यासारख्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे असणार आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या दडपशाहीसाठी कायद्याचा दुरुपयोग



संजय सोनवणी
सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक

**आमदार संजय गायकवाड यांनी या आठवड्यात 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकात शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याबद्दल प्रकाशक श्री. प्रशांत आंबी यांना अर्वाच्य शिवीगाळ करून हिंसक धमक्या दिल्या. महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकावी असे हे प्रकरण घडले. एखादा मजकूर आपल्याला आवडला नाही किंवा तो आपल्या विरोधात आहे असे वाटून (किंवा स्टन्ट करण्यासाठी आणि स्वस्त प्रसिद्धी मिळण्यासाठी) लेखक, प्रकाशक, पत्रकार, संपादक, विचारवंत, विश्लेषक यांना अशा धमक्या देण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. या धमक्या देण्याच्या प्रयत्नात कसलाही ठोस आधार नसताना**
**बदनामीच्या आणि वाट्टेल तेवढी अब्रूनुकसान भरपाई मागण्याचे, म्हणजे एका अर्थाने कायद्याचा दुरुपयोग करून धमक्या देण्याचे आणि आवाज बंद करण्याचे प्रयत्न करणे हेही सामील असते. कोर्टाचे खेटे नको म्हणून अनेकदा ज्याला नोटीस मिळाली ते एका चौकटीत दिलगिरी व्यक्त करून मोकळे होतात पण हा आहे धमकी देण्यासाठी कायद्यांचा दुरुपयोग करण्याचा प्रकार!**

## ...तो मतदारांचा घटनात्मक अधिकार

निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला आणि विशिष्ट पक्षाच्या प्रभावाखाली असलेल्या आघाडीला मदत होईल, अशी पक्षपाती भूमिका घेत आपली नैतिक जबाबदारी बजावली नाही, अशा स्वरूपाच्या विधानाने परदेशी यांची कोणती व्यक्तिगत बदनामी होते? निवडणूक अधिकारी कोणीही असता तरी या ना त्या प्रकारचे आरोप होणे स्वाभाविक आहे. लोकशाहीतील तो मतदारांचा घटनात्मक अधिकार आहे आणि असे आक्षेप घेतले जाणे हे राजकीय निवडणुकीपासून ते संस्थात्मक निवडणुकीत सर्वसामान्य आहे.

## वकिलाची सनद रद्द करा

'बदनामी झाली' असे अनेकदा तथ्यहीन, बेजबाबदार, कायद्याच्या व्याख्येत न बसणाऱ्या पण केवळ अशील सांगतो म्हणून नोटीसा खरडून पाठवणाऱ्या वकिलांची सनद रद्द करण्यात यावी, असा कायदा बनवण्याची आता गरज आहे. अशा नोटीसा बहुतेक वेळा केवळ घाबरवण्यासाठी, दडपण आणण्यासाठी पाठवल्या जातात. असंख्य प्रकरणात हा केवळ धमकी देण्याचा कायदेशीर प्रकार ठरतो. त्यालाच आता बेकायदेशीर ठरवणे आवश्यक झालेले आहे. कोर्टात दाखल होणाऱ्या बदनामीच्या खटल्यांचे प्रमाणही प्रचंड मोठे असून त्यामुळे न्यायालयावरील ताण वाढण्यास हातभार लागलेला आहे. शिवाय बदनामी झाली हे निर्विवाद सिद्ध करता येण्यात अपयश आल्याने या प्रकरणात दोषी ठरवले जाण्याचे प्रमाण अपवादात्मक म्हणजे अत्यल्प आहे. पण यात न्यायालयीन प्रक्रियेचा प्रचंड दुरुपयोग होतो आणि ज्याविरुद्ध तक्रार आहे तो मात्र अकारण भरडून निघतो. आधीच देशात निर्णयच न लागलेल्या खटल्यांचे प्रमाण (फौजदारी) पाच कोटीपेक्षा जास्त आहे. दिवाणी दाव्यांची संख्याही एवढी किंवा जास्तच असेल. त्यामुळे अनेक फौजदारी खटल्यांचेही निकाल लागायला २०-२५ वर्ष लागतात. शिवाय बदनामी ही अनेकदा सापेक्ष असते. बदनामी झाली असे वाटणे आणि खरेच बदनामी झालेली असणे यात फरक केला जायला हवा आणि वकीलानेही नोटीस पाठवण्याआधी किमान या बाबीचा विचार करायला हवा व आपल्या अशीलास तसे सांगायला हवे. पण तसे होताना दिसून येत नाही. कायद्यात सुधार नक्कीच हवेत पण ते अशा प्रकारचे हवेत.

हे लिहिण्याचे कारण म्हणजे साप्ताहिक 'चपराक'मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या गेल्या महिन्यातच झालेल्या निवडणुकीच्या एकंदरीत प्रक्रियेबद्दलचे वृत्त प्रसिद्ध झाले. संपादक घनश्याम पाटील, कार्यकारी संपादक प्रमोद येवले तसेच अन्य यांना मसापचे सरकारनियुक्त निवडणूक अधिकारी अ‍ॅड. प्रताप परदेशी यांच्यामार्फत काही दिवसातच बदनामीची पहिली नोटीस पाठवली गेली. त्यात 'माझी जाणूनबुजून बदनामी केली असून त्याबद्दल जाहीर माफी प्रसिद्ध करा अन्यथा चक्क वीस कोटी रुपयांची अब्रूनुकसानीबद्दल भरपाई करा' अशा स्वरूपाची मागणी केली गेली. या नोटिशीचे घनश्याम पाटील यांनी कायदेशीर उत्तरही दिले. नोटिशीचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर प्रताप परदेशी यांनी घनश्याम पाटील व प्रमोद पाटील यांना प्रत्यक्ष भेटीस बोलावले. आपण नोटीस पाठवली, तिचे उत्तरही आलेय, मग ज्यांना नोटीस पाठवली त्यांना भेटीस बोलावणे कितपत कायदेशीर आहे याचा विचार या स्वत: वकील असलेल्या सद्गृहस्थाने केला होता काय हे समजत नाही.

त्यानंतर लगोलग श्री. जयंत विष्णुदास किराड यांच्या तर्फे अजून एक नोटीस आली. त्यात म्हटल्याप्रमाणे 'चपराक'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या वृत्तातच 'स्वत: दत्तगुरुचे भक्त असल्याचा आव आणत त्यांनी (म्हणजे प्रताप परदेशी यांनी) न्यायप्रक्रियेला काळीमा फासला आहे' असा श्री दत्तात्रेयाची बदनामी करणारा उल्लेख आला असून, गुरुदेव दत्तभक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्याबाबत ४८ तासात बिनशर्त माफी मागा, शुद्धीपत्र प्रसिद्ध करा अन्यथा भारतीय न्याय संहिता कलम २९९ तसेच इतर लागू कलमांतर्गत फौजदारी व दिवाणी कारवाई केली जाईल अशा स्वरूपाचा मजकूर होता. नोटिशीत श्री. किराड यांच्या म्हणण्याप्रमाणे अ‍ॅड. प्रताप परदेशी श्री दत्ताचे निष्ठावंत भक्त असून मसापसंबंधी प्रकाशित लेखातील या उल्लेखाने त्यांच्या आणि दत्त संप्रदायातील भक्तांच्या भावना दुखावल्या गेलेल्या आहेत.

भारतात आजकाल सर्व निवडणूक प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात आहेत. राजकीय निवडणुकाच नाहीत तर एशियाटिक सोसायटी, मेडिकल कौन्सिल अशा सांस्कृतिक, वैद्यकीय अशा अराजकीय संस्थांच्या निवडणुकीत भाजपा हस्तक्षेप करतो आहे, प्रत्यक्ष प्रचार करतो आहे असे आरोप सर्वच वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत आणि ते सर्वांनी वाचलेले असतीलच. ही लोकशाही आहे आणि आरोप-प्रत्यारोप त्यातील एक गाभा आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघातही भाजपने प्रचार केला, निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केला अशा स्वरूपाची वार्तांकने निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यापासून ते संपून निकाल जाहीर झाला तोवर होतच होते. मी स्वत:ही एका भाजप आमदाराने आपला प्रतीनिधी पाठवून विशिष्ट आघाडीचा प्रचार केला होता, यावर आक्षेप घेतला होता. तसा लेखही दैनिक 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध झाला होता. महत्त्वाची बाब अशी की पत्रकार शेवटी जे पाहतात, ऐकतात त्याबाबत स्वत:ची आकलने व संबंधितांचे म्हणणे प्रसिद्ध करत असतात.

भारतातील सर्वच (राजकीय तसेच अराजकीय) निवडणुकांबद्दल व खुद्द निवडणूक आयोगाच्या प्रमुखापासून ते निवडणूक अधिकाऱ्यांवर निवडणुकीत पारदर्शकता ठेवली नाही असे आरोप आजकाल सररास होताना दिसतात. वृत्तपत्रे-माध्यमे त्यांनाही प्रसिद्धी देत असतात.

मतमोजणीच्या वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. प्रताप परदेशी यांनी पारदर्शकता ठेवली नाही, कायदेशीर प्रक्रिया पारदर्शकतेने मतमोजणी प्रक्रिया केली नाही अशा स्वरूपाचे निवडणूक विश्लेषण १६ मार्चच्या साप्ताहिक 'चपराक'मध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यात 'स्वत: दत्तगुरुचे भक्त असल्याचा आव आणत त्यांनी (म्हणजे प्रताप परदेशी यांनी) न्यायप्रक्रियेला काळीमा फासला आहे' असे एक विधान आहे. या विधानात दत्तगुरूंचा अवमान नसून एका व्यक्तिच्या वर्तनातील विसंगती त्या वृत्तात टिपलेली आहे. श्रीदत्ताचा अवमान केलेला नाही. देवतांच्या नावाला काळीमा फासणारी कृत्ये अनेक नरपुंगव आजकाल करताना दिसतातच. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव एकेरी का? यावरून प्रकाशक आंबी यांना अश्लील व हिंसक शिवीगाळ करणाऱ्याने छत्रपतींचा गौरव वाढवला असे कोणी शिवप्रेमी म्हणणार नाही. ज्याचे निस्सीम भक्त आहोत असे तुम्ही समजता त्याची बूज ठेवण्याचे वर्तन भक्ताकडून व्हावे अशी अपेक्षा बाळगणे कसे चुकीचे आणि बेकायदेशीर ठरेल?

'आमच्या धार्मिक भावना दुखावल्या' हा आजकाल तेढ माजवण्यासाठी अंधभक्तांचा एक परवलीचा मंत्र झाला आहे. यांना धर्म अथवा संप्रदाय याशी काही घेणे असल्याचे अथवा त्यातील नैतिक शिकवणुकीबाबत काही ज्ञान असल्याचे आजवरच्या अनेक घटनांतून दिसलेले नाही.

दुसरे असे की निवडणूक प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करणे, तिच्या पारदर्शकतेवर भाष्य करणे किंवा विश्लेषण मांडणे हा लोकशाहीतील एक महत्त्वाचा भाग आहे. वृत्तपत्रे आणि माध्यमे हीच भूमिका पार पाडतात. संबंधित वृत्तात प्रताप परदेशी किंवा कोणाही व्यक्तिच्या खाजगी आयुष्याबद्दल कोणतेही विधान नसून निवडणूक प्रक्रियेवरच भाष्य केले असल्याचे दिसते. असे असूनही संपादक आणि कार्यकारी संपादकांवर तसेच इतरांवर बदनामीची नोटीस बजावणे आणि माफी मागितली नाही तर फौजदारी आणि दिवाणी दावे दाखल करून चक्क वीस कोटी रुपयांची अब्रूनुकसान भरपाईचा खटला दाखल करण्याची धमकी देणे हा प्रकार कायद्याचा दडपशाहीसाठी दुरुपयोग याच सदरात टाकून देता येऊ शकतो. तसेच श्री. किराड यांनी पाठवलेली नोटीस तर आता हास्यास्पदतेचा कळस करणारी आहे.

'मुंह में राम-बगल में छुरी' हा वाक्यप्रयोग शेकडो वर्षांपासून भारतीय करत आलेले आहेत. यात श्रीरामाचा अपमान होतो अशी आजवर कोणाची भावना झालेली नाही. मग 'स्वत: दत्तगुरुचे भक्त असल्याचा आव आणत त्यांनी (म्हणजे प्रताप परदेशी यांनी) न्यायप्रक्रियेला काळीमा फासला आहे.' या विधानात श्रीदत्ताचा अवमान कसा होतो आणि कोणाची धार्मिक भावना कशी दुखावली जाऊ शकते?

आपण वकील आहोत किंवा वकिलाचा वापर करता येतो म्हणून आपल्या पेशाचा किंवा परिस्थितीचा दुरुपयोग करत लेखक-प्रकाशक-पत्रकार तसेच संबंधित इतरांना वकील बंधुंच्या मार्फत तथ्याचा अभाव असलेल्या नोटीसा पाठवल्या जाणे हा कायद्याचा दुरुपयोग म्हणता येईल. हा न्यायालयीन प्रक्रियेचाही अवमान होऊ शकेल. असा कायदा नसला तरी तो करणे आता आवश्यक झाले आहे.

कारण एक प्रकारे हाही लेखक-प्रकाशक-संपादक यांच्यावर दबाव आणून त्यांनी आपल्याला हवे तसे आणि रुचेल असेच लिहिले पाहिजे हा अघटनात्मक आग्रह अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा बळी चढवण्याचा प्रकार आहे. संजय गायकवाड काय आणि अशा तथ्यहीन नोटिशी पाठवणारे काय शेवटी 'दडपशाही'चे तत्त्व वापरून आवाज दडपण्यासाठी कार्य करणारे आहेत असेच कोणीही म्हणेल. 'मी कायद्याचा दुरुपयोग करू शकतो' ही भावना कोणाच्याही मनात अथवा कृतीत येणे किंवा मी लोकप्रतिनिधी आहे म्हणून कोणालाही मारहाण करू शकतो हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण नाही!

मी अशा सर्व प्रकारच्या दडपशाहीचा निषेध करतो.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार, अस्थिरोग, कॅन्सरवरील उपचार देण्याचा मानस : आबिटकर

## भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा ३१ वा स्थापना दिन समारंभ संपन्न

**पुणे, (प्रतिनिधी) :** आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार, अस्थिरोग आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवर जनसामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याची घोषणा राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्याचे अक्षय ऊर्जा व दुग्धविकास मंत्री अतुल सावे, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कुलसचिव जी. जयकुमार, आरोग्य विज्ञान विभागाच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, सहकार्यवाह डॉ. एम. एस. सगरे, डॉ. के. डी. जाधव यावेळी उपस्थित होते. भारती हॉस्पिटल येथील नूतनीकरण केलेल्या एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे कार्यालय, अत्याधुनिक नेत्ररोग विभाग व नेत्रपेढी तसेच आय. व्ही. एफ. सेंटरचे उद्घाटन आणि विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



**पुणे : भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करताना (डावीकडून) प्रा. मिलिंद जोशी, डॉ. एम. एस. सगरे, डॉ. अस्मिता जगताप, डॉ. विवेक सावजी, अतुल सावे, डॉ. विश्वजीत कदम, प्रकाश आबिटकर, डॉ. शिवाजीराव कदम, जी. जयकुमार. डॉ. के. डी. जाधव.**

तसेच गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी विश्वविद्यालयातील इर्षा या संशोधन संस्थेला आणि डॉ. वर्षा पोखरकर, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. रमा भादेकर, डॉ. सराह मरियम या संशोधक प्राध्यापकांना 'एक्सलन्स इन रिसर्च' या पुरस्काराने गौरविण्यात आले तसेच डॉ. संजय गांधी आणि गुंजन सायनी या कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रकाश आबिटकर म्हणाले, दर्जेदार शिक्षणातून गुणवत्ता जपत समाज घडविण्याचे कार्य भारती विद्यापीठामार्फत घडत आहे. अतुल सावे म्हणाले, संभाजीनगरचा विकास झपाट्याने होत असून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक उद्योग व्यवसायात होणार आहे. अशा वेळी कुशल, अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असणार आहे. तसेच आरोग्य व्यवस्थेचीही मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. भारती विद्यापीठाने संभाजीनगरमध्ये शैक्षणिक तसेच आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, भारती विद्यापीठाचे लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे भव्य शैक्षणिक संकुल उभे राहणार असून पुण्यात भव्य क्रीडासंकुल उभारण्यात येणार आहे.

डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, शिक्षणात तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन आहे, पर्याय नाही. शिक्षणामध्ये मानवीमूल्य, नैतिकता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

कुलगुरू डॉ. विवेक सावजी म्हणाले, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाने २०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांशी आणि विद्यापीठांशी शैक्षणिक सहयोग करार केले आहेत. यावर्षी विश्वविद्यालयाला महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्पांसाठी २८ कोटी हून अधिक अनुदान नामवंत संस्थांकडून मिळाले आहे. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र उत्तुरकर, प्रा. डॉ. ज्योती मंडलिक यांनी केले.

# अनुभवाचे अंतरंग कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा दिमाखात

**संगमनेर, (प्रतिनिधी) :** के. बी. दादा देशमुख सभागृहात 'चपराक प्रकाशन' प्रकाशित आणि लेखक अशोक शेटे लिखित 'अनुभवाचे अंतरंग' या लघुकथा संग्रहाचा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्याला संगमनेर आणि परिसरातील साहित्यप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी लेखक समाज बदलू शकतो ही भूमिका मांडत लेखणीच्या सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी ग्रामीण साहित्यावर भाष्य करताना सांगितले की, ग्रामीण भागातून नवनवीन लेखक तयार झाले पाहिजेत, तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य अधिक सक्षमपणे पुढे येईल.

नव्या लेखकांच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही देताना 'चपराक प्रकाशन'चे घनश्याम पाटील म्हणाले की, आजचे नवीन लेखक अतिशय दर्जेदार लिहित असून त्यांना आमच्या प्रकाशनातर्फे नेहमीच योग्य न्याय दिला जातो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले गुरुजी यांनी पुस्तकाचा सविस्तर आढावा घेतला आणि लेखक अशोक शेटे यांच्या प्रामाणिक



**संगमनेर : 'अनुभवाचे अंतरंग' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील**

स्वभावाचे व लेखनशैलीचे कौतुक केले. प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. कैलास दौंड यांनी शेटे यांच्या लेखणीचा गौरव करताना सांगितले की, लेखकाने आता इथून पुढे न थांबता अधिकाधिक सातत्याने लिहित राहिले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गोर्डे यांनी केले. आर. पी. राहणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ बनविल्याबद्दल अनुष्का वाकचौरे यांचा यावेळेस गौरव करण्यात आला.

सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे समाजात निरपेक्ष भावनेने शैक्षणिक व सामाजिक कामात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला. तसेच स्व. संदीप डुबे यांच्या स्मरणार्थ जे. एन. व्ही. पेमगिरीसह विविध शाळांना वैद्यकीय संचाचे वाटप करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय संदीप वाकचौरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ घुले व अक्षय खतोडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शशिकांत आव्हाड यांनी मानले. सोहळ्यासाठी माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, साहित्यिक व इतिहास संशोधक संतोष खेडलेकर, माजी पंचायत समिती उपसभापती मधुकर गुंजाळ, राजहंस दूध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, माजी पंचायत समिती सदस्य रावसाहेब डुबे, अशोक हजारे, शाम्प्रोचे संचालक शांताराम डुबे, युवावार्ताचे संपादक किसनभाऊ हासे, नायकचे संपादक गोरक्षनाथ मदने, माजी प्राचार्य कैलास शेटे, विश्वनाथ शेटे, संताजी देशमुख, राहता पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी राजेश पावसे, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, म.रा. प्रा.शि.संघ अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष प्रवीण ढुबे, शिक्षक बँकेचे संचालक भाऊराव राहिंज, माजी चेअरमन किसन खेमनर, संतोष दळे, विकास मंडळाचे माजी अध्यक्ष भाऊ ढोकरे, म.रा.प्रा.शि. संघ संगमनेर शाखा महिला अध्यक्ष सुनीता घुले, मुख्याध्यापक प्रकाश गोडसे, दादाभाऊ चौधरी, शा.व्य.स. अध्यक्ष रायभान गुंजाळ तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



चंद्रलेखा बेलसरे-जगताप,
पुणे ९८५०८९५०५१

# दाभोलकर तुमची आठवण येते

**अंधश्रद्धा ही मानसिक गुलामगिरी आहे, असे सांगणारे दाभोलकर आज तुमची प्रकर्षाने आठवण येत आहे. त्याचबरोबर गौरी लंकेश, कलबुर्गी, पानसरे यांची देखील आठवण येत आहे. कारणही तेवढेच महत्त्वाचे आहे. सध्या आपल्या देशात बाबा, बुवांचे पेव फुटलेले आहे. अशिक्षितच काय पण सुशिक्षित देखील या बाबा-बुवांच्या नादी लागलेले आहेत. अंधश्रद्धा आणि जुन्या रूढी, परंपरांचे युग केव्हाच संपले. वैज्ञानिक युग सुरू झाले तरी मनात रुजलेल्या अंधश्रद्धा मात्र काही केल्या जात नाहीत.**



नाशिकसारख्या धर्मक्षेत्री राहणाऱ्या एका बाबाने केवळ तुमच्या विचारांची हत्याच केली नाही तर भारताच्या इतिहासात लिहून न ठेवण्यासारखा एक अध्याय, वासनेचा नंगा नाच, महिलांचे शोषण अशी कृत्ये करून ठेवली आहेत. आज आम्ही मेल्यानंतरही अस्थी विसर्जनासाठी पवित्र गोदामाईच्या जलात अर्पण करण्याची इच्छा ठेवतो त्याच गोदामाईच्या कुशीत एक नराधम पैदा होतो. गोदेच्या पाण्यावर त्याचे शरीर पोसले जाते आणि भक्तांना गोदामाईचे पवित्र जल पाजण्याऐवजी तो चक्क स्वतःचे मूत्र, वीर्य आणि व्हिएग्रा देण्याचे पातक करतो तेव्हा तळपायाची आग मस्तकात गेल्याशिवाय राहत नाही. असे वाटते की, आमची गोदामाई अटली होती का? जिच्या जलात आम्हाला मेल्यानंतरही समाधी घ्यावीशी वाटते, ज्या पाण्याने आम्हाला स्नान करावेसे वाटते, त्याच गोदामाईच्या पवित्र जलाचा अव्हेर करून ह्या नराधमाने भक्तांना आपलेच तीर्थ प्यायला द्यावे आणि अंधभक्तांनी ते श्रद्धेने प्यावे! ह्यासारखे दुर्दैव नाही.

हे सर्व ऐकताना, पाहताना आपण नक्कीच पुरोगामी असलेल्या महाराष्ट्रात राहतो का अश्मयुगात वावरतोय? ह्याची शंका येते. एकापाठोपाठ अनेक अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचताना शरमेने मान खाली जाते. आता दोष कोणाला देणार? त्या नराधमाला? का त्याला स्वेच्छेने स्वाधीन होणाऱ्या त्या बायकांना? का जगात अशा घटना घडत आहेत, हे माहीत असून सुद्धा त्या महिलांना मनात कोणताही किंतु न आणता त्या बाबाच्या खोलीत पाठवणाऱ्या त्या नवऱ्यांना? एखादा पुरुष आपल्या बायकोशी काय वर्तन करू शकतो? याची त्या पुरुषाला जाणीव नसेल का हो? नक्कीच असणार! तसेच एखादा बाबा शेवटी एक पुरुष असतो, हे माहीत असताना सुद्धा त्याच्या खोलीत बिनधास्तपणे जाणाऱ्या त्या महिलांना याची जाणीव असू नये? यावर तर विश्वासच बसत नाही अन् तो नराधम तर बघा, किती पोहोचलेला असतो? राजरोसपणे तो त्या महिलेचे शील भंग करतो, हिच बातमी लिक झाली तर आपल्यावर आपत्ती ओढवू शकते, याची जाणीव त्याला असत नाही, हे तर शक्यच नाही पण एकप्रकारचा उन्माद यांना अशी कृत्ये करण्यास भाग पाडतो आणि त्याचे परिणाम पुढे दिसून येतात. आमच्या तुकोबा महाराजांनी चक्क लिहून ठेवले आहे की, अशा अंगाऱ्या- धुपाऱ्याने किंवा कोणा बाबाच्या कृपेने अशी पोरे निर्माण होत असतील तर मग नवऱ्याची, विवाहाची गरजच कशाला? विवाहाविना किंवा कुमारिकांना सुद्धा मातृत्व मिळू शकते पण ह्या जगात सर्वांनाच माहीत आहे की, असे कधीच होत नाही. मग आमचे लोक या भाकडकथांवर विश्वास ठेवून असे कसे बळी पडू शकतात? इतक्या वर्षांपासून तुकोबा, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज आमचे प्रबोधन करत आलेय, तरीही आम्ही असे कसे वागू शकतो? अन् ते ही या एकविसाव्या शतकात? खरंच विश्वास बसत नाही. त्याच आमच्या महान संतांचा वारसा अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश पुढे चालवला आहे पण पुढे त्यांचे काय झाले? त्यांचे खून करायला आमच्या समाजाने कमी केले नाही. अजूनही त्यांना न्याय मिळाला नाही. अशीच जर आमची समाजव्यवस्था राहिली तर मात्र कठीणच आहे, यात शंका नाही.

अशावेळी खरंच दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी तुमची आठवण आल्याशिवाय राहत नाही. जे तुकोबांचे, ज्ञानेश्वरांचे झाले तेच तुमचे देखील झाले. फरक फक्त एवढाच आहे की, तुकोबा आविष्कार झालेला नसताना सुद्धा काल्पनिक पुष्पक विमानात बसून सदेह वैकुंठाला पोहोचले, ज्ञानेश्वराने जिवंत समाधी घेतली, या गोंडस नावाखाली त्यांचे खून पचविण्यात सनातन्यांना यश मिळाले मात्र तुमचे खून हे खूनच ग्राह्य धरले गेले पण तुम्हाला अद्याप न्याय मिळाला नाही. हे कोणी केले? ते खरंच गुन्हेगार होते का? याचे उत्तर अद्यापही मिळालेले नाही. कालांतराने हा विषय असाच दडपला जाईल आणि पुढे वर्षानुवर्षे बाबा, बुवांना अभय मिळत जाईल. ते उजळ माथ्याने असेच समाजात वावरत राहतील. काही दिवसांनी हे उठलेले वादळ आपोआप शमून जाईल. सर्व जण झाले, गेले ते विसरून जातील. परत एखादा बाबा, बुवा जन्माला येईल, तोही असेच वर्तन करेल आणि पुन्हा त्याच गोष्टी, तोच विषय चघळला जाईल आणि करमणुकीनंतर तो विषय बाजूला पडत जाईल. जेष्ठ विचारवंत समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न करतील अन् शेवटी कंटाळून तेही गप्प बसतील. जर त्यांचे कोणी ऐकायलाच तयार नसतील, त्यातील धोके लक्षात येऊन सुद्धा सुधारायला तयार नसतील तर कोण काय करू शकतो? शेवटी प्रत्येकाने आपले जीवन कसे जगायचे तो त्याचा वैयक्तिक दृष्टिकोन असतो. त्याच्या इच्छेपुढे सर्व व्यर्थ आहे. ■■

---

# आरती प्रभू : बहुमुखी लेखक



शिरीष चिटणीस
सातारा
७५८८८६५०५१



मराठी साहित्यमनाचा एक अत्यंत संवेदनशील, तरल आणि अनुभवपर आवाज २६ एप्रिल १९७६ रोजी निवृत्त झाला, तो म्हणजे चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांचा, ज्यांना आपण 'आरती प्रभू' या नावाने ओळखतो. २६ एप्रिल २०२६ रोजी त्यांच्या निधनाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांच्या या ५० व्या पुण्यतिथीचा उल्लेख केवळ स्मृतिदिन न मानता, त्यांच्या लेखनाचे आजच्या काळात असलेले सांस्कृतिक आणि कलात्मक मूल्य समजून घेण्याचे एक निमित्त मानणे अधिक शोभणारे आहे.

चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांना मराठी साहित्यात एक बहुमुखी लेखक म्हणून ओळखले जाते पण गायक-रसिक, नागरिक आणि रेडिओ प्रेक्षक त्यांना 'आरती प्रभू' या नावाने ओळखतात. त्यांनी गद्यलेखनात आपले अस्तित्व चिंतामणी त्र्यंबक खानोलकर या नावाने ठेवले तर कविता आणि गीतलेखनात त्यांचा आत्मा 'आरती प्रभू' या नावाने व्यक्त झाला. या नावात 'आरती' म्हणजे भावनांचे आदर्श समर्पण आणि 'प्रभू' म्हणजे अनंत अनुभवाचा स्रोत असे दृष्टिकोन निर्माण होतात, जो त्यांच्या कवितेच्या भावपूर्ण आणि निसर्गवादी स्वरूपाशी अचूक जुळतो. खानोलकर यांचा जन्म ८ मार्च १९३० रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील बागलांची राई येथे झाला. लहानपणचे कोकणातील निसर्ग वातावरण, उथळपातळ नावगऱ्यांचा जीवनसंघर्ष आणि ग्रामीण जीवनाची ताजी भावनाचित्रे यांनी त्यांच्या डोळ्यांसमोर एक विशिष्ट दृष्टिकोन निर्माण केला. नंतर त्यांनी मराठी, तत्त्वज्ञान आणि साहित्यिक अध्ययनाचा अभ्यास केला, ज्यामुळे त्यांच्या काव्यात निसर्गवर्णनाबरोबरच अंतःस्फूर्त तत्त्वज्ञानात्मक विचार दिसून येतात. २६ एप्रिल १९७६ रोजी मुंबईत त्यांच्या अकाली निधनाने मराठी साहित्याला एक गाभाळ झाले; पण त्यांच्या लिखाणातून उमलणारी भावपूर्ण तरलता आजही तेवढीच जिवंत आहे. खानोलकर एक 'संस्कृतिमूल्य' आणि 'रसिकाचे मनोरंजन' या दोन्ही बाजूंना जुळणारे लेखक आहेत. त्यांच्या कवितासंग्रहांमध्ये 'जोगवा' (१९५९), 'दिवेलागण' (१९६२) आणि विशेषत्वाने 'नक्षत्रांचे देणे' (१९७५) या नावांचा समावेश होतो. 'नक्षत्रांचे देणे' या कवितासंग्रहासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मरणोत्तर मिळाला, जो त्यांच्या लयमय कवितांच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्तेचा आणि भारतीय भाषिक वातावरणातील वेगळ्या ओळखीचा पुरावा आहे. त्याचबरोबर खानोलकर आजही मुख्यत्वे त्यांच्या गीतलेखनामुळे लोकप्रिय आहेत. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी त्यांच्या बाणात घेतलेली गीते आजच्या काळातही तेवढीच रसिकांच्या मनावर राज्य करतात.

**'गेले द्यायचे राहूनी, तुझे नक्षत्रांचे देणे'**

**'ये रे घना', 'तू तेव्हा तशी'**

या गीतांच्या ओळींमध्ये वेदना, विरह, आत्मसंभ्रम आणि निसर्गाचे अल्पशब्दी वर्णन त्यांच्या लेखनाचा ठसा दाखवतात. रेडिओ, टीव्ही, सिनेमा आणि साहित्याच्या विद्यार्थी वर्गापर्यंत ही गीते अनुवादस्वरूपातही वापरली जातात.

खानोलकर फक्त कवी आणि गीतकार नव्हते; ते एक कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार म्हणूनही समकालीन आणि नंतरच्या पिढीच्या कलेला प्रभावित करणारे लेखक होते.

कथासंग्रह : सनई (१९६४), राखी पाखरू (१९७१), चाफा आणि देवाची आई (१९७५) यामध्ये त्यांच्या पात्रांच्या मानसिक स्थितीचे नेमके आणि निर्विकार आकलन दिसून येते. कादंबऱ्या : कोंडुरा, त्रिशंकू, गणुराय आणि चानी, पाषाण पालवी, अजगर, पिशाच्च यासारख्या नावांनी त्यांची कथा नि ककल्पना ओळखली जाते. या कादंबऱ्यांवर तेलुगू, हिंदी आणि मराठी चित्रपट, नाटक आणि टेलिव्हिजन अडॅप्टेशन झाले आहेत, त्यामुळे त्यांच्या कथाकल्पनेचा दृश्यसंस्कृतीवरही ठसा आहे. त्यांच्या नाटकलेखनासाठी त्यांना 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६) मिळाला, जो त्यांच्या रंगमंचीय वाक्यरचनेला आणि त्यांच्या नाटकांच्या सामाजिक, तात्त्विक आधाराला दिलेले गुण प्रमाण आहे. एक शून्य बाजीराव, अजब न्याय वर्तुळाचा, सगेसोयरे यासारखी नाटके आजही रंगमंचावर आणि वाचासाहित्यात उल्लेखली जातात. २०२६ च्या वेगवान, तंत्रज्ञाननिर्भर आणि शब्दकमी असलेल्या जगात खानोलकरांच्या लेखनाचा असा प्रभाव का टिकून आहे, हे प्रश्न वाचकांना उद्धवतात. उत्तर साधे आहे : त्यांच्या शब्दांमध्ये असलेले मानवी अस्तित्वाचे तत्त्वज्ञान, निसर्गाची संवेदनशील दृष्टी आणि भावनांची अतिशय निर्भ्रम व्यक्तिमुखी वाटच त्यांनी दाखविली आहे. ■■

# साताऱ्यात 'अमेरिकेचे अंतरंग' पुस्तकाचे उत्साहात प्रकाशन



**सातारा, (प्रतिनिधी) :** अनेक लेखकांनी विविध प्रकारची प्रवासवर्णने लिहिली आहेत. एकाच देशाचा किंवा प्रदेशाचा प्रवास करून आलेल्या लेखकांची प्रवासवर्णने सुद्धा विविध प्रकारची आणि वेगळी असतात; कारण लेखकाने अनुभवलेले जग आणि त्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या प्रवासवर्णनात उमटते, असे मत विविध मान्यवरांनी व्यक्त केले. 'चपराक प्रकाशन'ने प्रसिद्ध प्रकाशित केलेल्या श्रीराम नानल यांनी लिहिलेल्या 'अमेरिकेचे अंतरंग' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा येथील दीपलक्ष्मी सभागृहात पार पडला तेव्हा उपस्थित मान्यवरांनी हे मत व्यक्त केले.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे होते. यावेळी व्यासपीठावर 'चपराक प्रकाशन'चे संचालक घनश्याम पाटील, व्यवस्थापक प्रमोद येवले, ज्येष्ठ पत्रकार मुकुंद फडके, आम्ही पुस्तक प्रेमी समूहाचे डॉक्टर संदीप श्रोत्री, दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शिरीष चिटणीस, व्यवस्थापक विनायक भोसले, उज्ज्वला नानल, विशाल देशपांडे उपस्थित होते.

प्रारंभी लेखक श्रीराम नानल यांनी या प्रवास वर्णनात्मक पुस्तकामागील कल्पना आणि भूमिका स्पष्ट केली. परदेश प्रवास त्यातही अमेरिकेचा प्रवास ही माझ्या बकेट लिस्टमधील एक महत्त्वाची गोष्ट होती, ती या निमित्ताने पूर्ण झाली. या प्रवासाचा आढावा या पुस्तकामध्ये घेण्यात आला आहे असे त्यांनी सांगितले.

घनश्याम पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये अतिशय चांगले पुस्तक प्रकाशित होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पुस्तक वाचकांनी विकत घेऊन वाचावे आणि प्रतिक्रिया द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले. प्रवास वर्णन हा एक वैयक्तिक अनुभव असल्यामुळे प्रत्येक लेखकाचे लेखन वेगळे असते यावर त्यांनी जोर दिला.

विनोद कुलकर्णी म्हणाले, श्रीराम नानल हे सामाजिक भान ठेवणारे आणि कोणत्याही विषयाकडे पोटतिडीकेने पाहणारे लेखक आहेत. त्यांनी अनेक चांगली माणसे साताऱ्याशी जोडली आहेत. या प्रवास वर्णनाच्या निमित्ताने त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. नानल यांच्या नजरेने टिपलेले अमेरिकेचे अंतरंग वाचकांना निश्चितच आवडेल.

मुकुंद फडके म्हणाले, लेखकाचे व्यक्तिमत्त्व नेहमीच लेखनामध्ये उमटते. श्रीराम नानल यांचे सौम्य आणि चिकित्सक व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखनामध्येही आपल्याला पाहायला मिळते. अमेरिकेचे दर्शन घडवताना त्यांनी तेथील सामाजिक समस्याही व्यक्त केल्या आहेत. अमेरिकेसारख्या महासत्तेचा एक चिकित्सक अनुभव श्रीराम नानल यांच्या या लेखनाच्या निमित्ताने वाचकांना वाचायला मिळणार आहे. अनवट अमेरिकेचे दर्शन त्यांनी यानिमित्ताने घडवले आहे.''

डॉ. संदीप श्रोत्री म्हणाले, प्रत्येकाचा चष्मा आणि नजर वेगळी असते आणि शैलीही वेगळी असते. त्याचेच प्रतिबंब प्रवास वर्णनाच्या लेखनामध्ये उमटते. श्रीराम नानल यांच्या या पुस्तकामध्ये सुद्धा त्यांची शैली उमटली आहे. हे प्रवास वर्णन अतिशय विचार करून लिहिले आहे. साधारणपणे प्रवास हा शरीराचा असला तरी तो खऱ्या अर्थाने विचारांचा प्रवास असतो हे या पुस्तकातून समोर येते. शिरीष चिटणीस म्हणाले, श्रीराम नानल सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत पण ते जरा उशिरा लेखक झाले. त्यांनी अनेकांना लेखनाला प्रोत्साहित केले. बँक अधिकारी असूनही त्यांची लेखनशैली अत्यंत सुंदर आहे.

अमेरिकेचे अंतरंग या पुस्तकामध्ये त्यांच्या या शैलीचे दर्शन घडते. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्रीकांत कात्रे यांनी या पुस्तकाचे संस्करण करतानाची आपली भूमिका स्पष्ट केली. श्रीराम नानल यांनी या प्रवास वर्णनामध्ये जबाबदार पर्यटनाला महत्त्व दिले आहे. अमेरिका आणि भारताची तुलना ज्या ठिकाणी करावी लागली त्या ठिकाणी त्यांनी ती केली आहे. कोठेही नकारात्मक बाजू मांडली नाही. नानल यांच्याकडून भविष्यातही अशाच प्रकारचे लेखन अपेक्षित आहे. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन सविता कारंजकर यांनी केले. दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक विनायक भोसले यांनी आभार मानले. या प्रकाशन सोहळ्याला साताऱ्यातील विविध मान्यवर, आम्ही पुस्तक प्रेमी समूहाचे सदस्य उपस्थित होते.

# क्रिकेट आणि लाईफ मॅनेजमेंट




**रवींद्र कामठे**
पुणे
९४२१२ १८५२८

**पुस्तक परिचय**

मी ४५ वर्षे नोकरी करत होतो. त्यातली शेवटची २०-२५ वर्षे व्यवस्थापन म्हणजे अर्थातच मॅनेजमेंटमध्ये कार्यरत होतो. त्यामुळेच की काय मॅनेजमेंट या विषयाची मला जरा जास्तच आस्था आहे. त्यात कुठल्याही गोष्टीचे मॅनेजमेंट अर्थात व्यवस्थापन जर का नीटनेटके आणि नियोजनबद्ध असेल तर त्याची फलश्रुती ही कायम चांगलीच असते हा माझा तरी अनुभव आहे. मला तर दर पाच वर्षांचे नियोजन करून त्यानुसार योजनाबद्ध पद्धतीने वागायला फार आवडते. आयुष्य कसे विनासायास जायला मदत होते आणि ते जगायलाही मज्जा येते. 'जगण्यासाठी मरतो कशाला, मरण्यासाठीच जगणे हे, कर्म तू करीत राहा, फळ ज्याचे त्यातच आहे,' असेच म्हणावेसे वाटते.

जन्माला आल्यावर जगणे हे ओघाने आलेच. 'रडत कुढत जगायचे की हसत हसत जगायचे' हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्याचे काय आहे, किडे-मुंग्याही जगतातच की! इथेच आपण गल्लत करतो. जगणे ही एक कला आहे. हे मात्र या छोट्याशा जीव जंतुकडून शिकण्यासारखे आहे. व्यवस्थितपणे नियोजन करून, शिस्तबद्ध पद्धतीने जीवन जगले तर आपले तर आयुष्य सुखकर जातेच जाते पण आपल्याशी निगडित असलेल्या इतरांचेही आयुष्य विनासायास जाण्यास मदत होते. अर्थात त्यासाठी आयुष्यात योग्य त्या मॅनेजमेंटची म्हणजेच व्यवस्थानाची गरज असते, जी की हे छोटेसे जीव जंतूही नैसर्गिक पद्धतीने करत असतात. माणसांना मात्र हे मॅनेजमेंट/व्यवस्थापन शिकवावे लागते.




त्याचीच प्रचिती मला सातारा येथे आयोजित ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात नाशिकच्या डॉ. गिरीश पाटील यांच्या 'क्रिकेट आणि लाईफ मॅनेजमेंट' ह्या व्यक्तिमत्त्व विकास विषयावरील पुस्तकाच्या प्रकाशनाने आली. 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेले हे अजून एक अत्यंत वेगळ्याच धाटणीचे पुस्तक माझ्या हातात पडले. मी ते वाचले आणि मला या पुस्तकाचा विषय खूपच आवडला म्हणून थोडेसे त्याबद्दल व्यक्त व्हावेसे वाटले.

मॅनेजमेंट ह्या एका अत्यंत अवघड विषयाची, क्रिकेट ह्या सगळ्यांच्या आवडत्या खेळाशी सांगड घालून प्रा. डॉ. गिरीश पाटील यांनी आयुष्याच्या व्यवस्थपनाचे अत्यंत थोडक्यात विवेचन केले आहे. थोडासा क्लिष्ट वाटणारा पण तितकाच महत्त्वाचा विषय गिरीश पाटील यांनी इतक्या सहजपणे उलगडून सांगितला आहे की हे पुस्तक हातात घेतल्यावर ते वाचून पूर्ण केल्याशिवाय खाली ठेवावेसेच वाटत नाही.

आपल्याला सर्वांनाच माहिती आहे की क्रिकेटची मॅच सुरू होते ती टॉस करून म्हणजेच 'छापा आणि काटा' करून होते. सामना सुरू होतो, एक संघ टॉस जिंकतो तर दुसरा हरतो. अगदी इतकी साधी सोपी वाटणारी क्रिया जेव्हा लेखक तिला आपल्या आयुष्याशी जोडून आपण आयुष्यात निर्णय घेताना संधीचे कसे सोने करायचे हे अतिशय सोप्या भाषेत सांगून वाचकांशी संवाद साधण्याचा चांगला प्रयत्न केला आहे.

क्रिकेटच्या सामन्यातील कर्णधाराची तुलना लेखक एकदम आपल्या सामान्य आयुष्यातील नेतृत्व कौशल्यावर विवेचन करून वाचकाला थोडासा सकारात्मक उपदेश देतात. तसेच आपल्याला क्रिकेटमधील तिसरा पंच व त्याची सामन्यातील भूमिका समजावता समजावता आपल्या आयुष्यातील नियती आणि नशीब ह्या जीवनातील तिसऱ्या पंचांची आठवण करून देतात. लेखक सचिन तेंडुलकरची बॅट बोलते हे उदाहरण देऊन आपल्या कर्तृत्वाने निंदकांचे तोंड बंद करण्याचा सल्लाही देतात.

क्रिकेटच काय कुठल्याही खेळात सराव हा एक खूप महत्त्वाचा घटक आहे. अगदी तो धागा धरून लेखक वाचकाला त्याच्या आयुष्यात कठोर परिश्रम, सातत्य, सचोटी आणि नीतीमत्ता याचे महत्त्व अधोरेखित करून आयुष्यात ह्या मूल्यांचा सराव करण्याचा मूलमंत्र देऊन जातात. क्रिकेट ह्या खेळातील प्रत्येक घटनेवर सूक्ष्म निरीक्षण करून गिरीश पाटील यांनी व्यवस्थापकीय कौशल्याची आपल्या वैयक्तिक आयुष्याशी सांगड घालून वाचकांना मोजक्या शब्दांत मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे.

क्रिकेट खेळाच्या अतपासून इतिपर्यंतच्या प्रत्येक घटनेवर आपल्या आयुष्याच्या व्यवस्थापनेचा परामर्श घेताना पुस्तकाच्या शेवटी त्यांनी 'कोठे थांबावे?' हा प्रश्न उपस्थित करून वाचकाला गंभीर होऊन विचार करायला भाग पाडले आहे. आपले कार्य बहरत असताना अथवा त्याला उतरती कळा लागण्याच्या आत वेळेवर निवृत्त होणे हे कधीही फायद्याचे असते हा त्यांचा उपदेश नक्कीच भावणारा आहे. धकाधकीच्या आयुष्यात करण्यासारख्या खूप गोष्टी असतात, त्या योग्य वेळी घेतलेल्या निवृत्तीनंतरही करता येतातच हे मात्र मनाला एकदम पटतेच.

'लाईफ मॅनेजमेंट' अर्थात आयुष्याचे व्यवस्थापन हे दिसते तितके काही सोपे आणि सरळ नसते. त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. म्हणूनच मला प्रा. डॉ. गिरीश पाटील यांना एक विनंती करायची आहे की त्यांचा व्यवस्थापन विषयातील दांडगा अभ्यास असून त्यांनी ह्या विषयावर अजून थोडे विस्तृत लेखन केल्यास वाचकांना नक्कीच फायदा होईल.



**मयूर बागुल**
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

# बालमजुरी

गावाच्या शेवटी, रेल्वे लाईनच्या कडेला उभ्या असलेल्या जुन्या झोपड्यांच्या रांगेत एक छोटीशी झोपडी होती. त्या झोपडीत राहायचा गणू. वय केवळ दहा वर्ष! पण चेहऱ्यावर मात्र मोठ्यांसारखी गंभीर रेषा. त्याच्या डोळ्यात खेळण्याचे, शाळेचे, मित्रांचे स्वप्न नव्हते. होती फक्त उद्याच्या पोटाची चिंता. गणूचा दिवस सूर्योदयाआधीच सुरू व्हायचा. आई त्याला हलकेच उठवायची, ''गणू, उठ बाळा उशीर होईल.'' तो डोळे चोळत उठायचा. अजून झोप पूर्ण व्हायची नाही पण थांबणं त्याला परवडणारं नव्हतं! कारण तो शाळेत जाणारा मुलगा नव्हता. तो हॉटेलात काम करणारा 'लहान कामगार' होता.

गणूच्या वडिलांचा दोन वर्षांपूर्वी अपघातात मृत्यू झाला होता. आई घरकामाला जायची पण तेवढ्यात घर चालणं कठीण होतं. दोन लहान बहिणींचं पोट भरायचं होतं आणि म्हणून गणूने खेळण्याऐवजी कामाची वाट धरली. गावातल्या छोट्या हॉटेलात तो कामाला लागला. सकाळी चहा नेणे, टेबल पुसणे, भांडी धुणे, पाणी भरून ठेवणे... त्याची कामं संपायचीच नाहीत. ''ए गण्या! पटकन पाणी दे रे!'' मालकाचा आवाज दर दहा मिनिटांनी यायचा. गणू धावत जायचा.

''हो मालक!'' त्याच्या छोट्या हातांना गरम भांड्यांची सवय झाली होती. कधी हात भाजायचे, कधी काच फुटून बोट कापलं जायचं; पण वेदना व्यक्त करायला त्याला वेळ नव्हता. हॉटेलच्या समोरून रोज शाळेची मुलं जात असत. त्यांच्या पाठीवर दप्तर, हातात पाण्याच्या बाटल्या, चेहऱ्यावर आनंद. गणू काम करत करत त्यांच्याकडे पाहायचा. त्याच्या मनात एक विचित्र ओढ निर्माण व्हायची. एकदा त्याने आईला विचारलं, ''आई मी पण शाळेत जाऊ शकतो का?'' आई काही बोलली नाही. तिच्या डोळ्यांत पाणी आलं.

''बाळा आपली परिस्थिती...'' ती थांबली. गणूला उत्तर समजलं. त्या दिवसानंतर त्याने पुन्हा कधी शाळेचा विषय काढला नाही पण त्याचं मन मात्र रोज त्या शाळेच्या घंटेसोबत उडत असे. हॉटेलात येणाऱ्या ग्राहकांमध्ये एक शिक्षकही होते. रोज चहा प्यायला येणारे. गणू नेहमी त्यांना हसून चहा द्यायचा. एक दिवस शिक्षकांनी विचारलं, ''तुझं नाव काय रे?''

''गणू.''

''शाळेत जातोस का?''

गणू काही बोलला नाही. फक्त खाली पाहत राहिला. शिक्षकांना सगळं समजलं. ''तुला शाळेत जायचं आहे का?'' त्यांनी हळू आवाजात विचारलं. गणूने मान वर केली. त्याच्या डोळ्यात आशेची एक छोटीशी ज्योत चमकली. हो पण तो थांबला. त्या दिवशी शिक्षकांनी त्याच्या आईला भेटायचं ठरवलं. संध्याकाळी ते गणूच्या घरी गेले. झोपडी पाहून त्यांना सगळं समजलं. आईने नम्रपणे त्यांना बसायला जागा दिली.

''ताई, गणूला शाळेत पाठवा,'' शिक्षक म्हणाले. आई हसली पण ते हसू वेदनांनी भरलेलं होतं.

''साहेब, त्याने काम नाही केलं तर घर कसं चालेल?'' हा प्रश्न! शिक्षकांकडेही उत्तर नव्हतं पण त्यांनी हार मानली नाही. ''शासनाच्या योजना आहेत. त्याला मोफत शिक्षण मिळेल. आम्ही मदत करू.''

आईच्या मनात आशेचा किरण उमटला पण भीतीही होती. दुसऱ्या दिवशी शिक्षकांनी मालकाशी बोलण्याचा प्रयत्न केला. ''हा मुलगा कामाला लावणं चुकीचं आहे,'' त्यांनी सांगितलं. मालक हसला. ''साहेब, हा स्वतः काम करायला आला. मी जबरदस्ती केली नाही!'' पण शिक्षकांनी हार मानली नाही. त्यांनी गावातल्या लोकांशी चर्चा केली. बालमजुरीविषयी जागरूकता निर्माण केली. हळूहळू लोकांना समजायला लागलं की गणूसारखी मुलं कामासाठी नाहीत, शिकण्यासाठी आहेत. एक दिवस असा आला की गणूला हॉटेलातून सोडण्यात आलं. त्याच्या हातात पहिल्यांदाच दप्तर होतं. पहिल्या दिवशी तो शाळेत गेला तेव्हा त्याला सगळं नवीन वाटलं. वर्ग, फळा, शिक्षक, मित्र! त्याला अक्षरं ओळखायला शिकवलं गेलं. 'अ' लिहिताना त्याचे हात थरथरत होते कारण हे अक्षर त्याच्या आयुष्याचा नवा प्रारंभ होता! पण संघर्ष संपला नव्हता. घरात अजूनही गरिबी होती. आई अजूनही काम करत होती. गणू शाळेनंतर छोट्या-मोठ्या कामात आईला मदत करायचा पण आता त्याच्या चेहऱ्यावर थकवा कमी आणि आशा जास्त होती. तो अभ्यासात हुशार निघाला. शिक्षक त्याला प्रोत्साहन देत राहिले. एक दिवस त्याने वर्गात निबंध लिहिला. 'माझं स्वप्न!' त्यात त्याने लिहिलं, ''मला मोठं होऊन शिक्षक व्हायचं आहे; कारण मला इतर गणूंना कामातून बाहेर काढायचं आहे.'' वर्गात शांतता पसरली. शिक्षकांच्या डोळ्यांत अभिमान चमकला. वर्ष सरली. गणू आता मोठा झाला. त्याने शिक्षण पूर्ण केलं आणि एक दिवस तो खरोखर शिक्षक झाला पण तो फक्त पुस्तक शिकवणारा शिक्षक नव्हता. तो बालपण परत देणारा शिक्षक होता. तो गावोगावी जाऊ लागला. हॉटेल, कारखाने, बांधकाम साईट्स जिथे जिथे लहान मुलं काम करताना दिसायची, तिथे तो उभा राहायचा. तो त्यांच्या आई-वडिलांशी बोलायचा. त्यांना शिक्षणाचं महत्त्व समजवायचा कारण त्याला माहीत होतं बालमजुरी म्हणजे फक्त काम नाही, ती म्हणजे बालपणाची चोरी आहे. एक दिवस तो पुन्हा त्या जुन्या हॉटेलासमोर उभा राहिला. त्याच्या डोळ्यांसमोर त्याचं बालपण उभं राहिलं. गरम भांडी, मालकाचा आवाज, शाळेकडे पाहणारे डोळे पण आज तो तिथे कामगार म्हणून नव्हता. तो तिथे बदल घडवणारा म्हणून उभा होता आणि त्या क्षणी त्याला जाणवलं एक छोटा निर्णय, एक मदतीचा हात, एक शिक्षक एका मुलाचं आयुष्य बदलू शकतो आणि कदाचित संपूर्ण समाजाचंही. बालमजुरी ही केवळ गरिबीची समस्या नाही, ती संधीच्या अभावाची शोकांतिका आहे. गणूसारखी हजारो मुलं अजूनही काम करत आहेत. त्यांच्या हातात खेळणी नाहीत तर कामाची साधनं आहेत. त्यांच्या डोळ्यात स्वप्नं नाहीत तर जबाबदाऱ्या आहेत पण जर प्रत्येकाने एक पाऊल उचललं तर कदाचित प्रत्येक गणू पुन्हा एकदा मुलगा बनू शकेल.



**भरत विठ्ठल पाटील**
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

# बचतीचं धन

सकाळी साडे नऊ वाजले होते. उन्हाळ्याची चाहूल लागल्याने पंखा लवकर सुरू केला होता. तो भरभर फिरत होता. सर्व विद्यार्थी फळ्यावर लिहिलेले वहीत रेखाटून काढत होते. ते कामात गढून गेले होते. अचानक, वीज गेली. वर्गात अंधार झाला.

''अय, लाईट गयी भो?'' कोपऱ्यात बसलेल्या भूषणने सूर लावला.

''ना रं भुष्या, दिसं बी ना वहीमाधलं. काय करानं आता?'' शेजारच्या चेतनने त्याला प्रतिसाद दिला.

सर्व वर्ग काहीच वेळात विस्कळीत झाला. पहिल्या बेंचवर बसलेला गणेश उठून उभा राहिला. लाईट बोर्डकडे गेला. त्याला मी पाहतच राहिलो. त्याने बोर्डावर सुरू असलेली सर्व बटणं बंद केली आणि म्हणाला, ''आपण लाईटपण वाचवायची सर.''

प्रसंग छोटा होता पण एक महत्त्वाचा धडा समोर येऊन उभा राहिला होता, परिसर अभ्यासाचा. काही दिवसांपूर्वी बचतीचा धडा आज प्रत्यक्षात कृतीत उतरला होता. आपण दैनंदिन जीवनात अनेक गोष्टी बचत करू शकतो. विजेची बचत करण्यासाठी घरातील आणि शाळेतील अनावश्यक लाईट, पंखे किंवा उपकरणे बंद ठेवता येतात. पाण्याची बचत करण्यासाठी झडप नीट बंद ठेवणे, पाणी वाया न जाणे याकडे लक्ष देता येते. खाण्यापिण्याची बचत करण्यासाठी जेवण गरजेप्रमाणे घेणे, अन्न वाया न जाणे महत्त्वाचे आहे. पैशाची बचत म्हणजे अनावश्यक खर्च टाळणे, पैसा योग्य रीतीने वापरणे आणि भविष्यासाठी थोडा निधी बाजूला ठेवणे. कपडे, पुस्तकं, साहित्य किंवा इतर वस्तू काळजीपूर्वक वापरल्यासही बचत होते. दैनंदिन जीवनात ह्या छोट्या प्रयत्नांमुळे आपण जबाबदार, संवेदनशील आणि नियोजनक्षम बनतो. यामुळे आपल्या सभोवतालच्या लोकांनाही प्रेरणा मिळते. हे सारे आम्ही चर्चेतून समजून घेतले होते. वाया घालवू नये, बचत करावी हा धडा प्रेरक ठरला होता.

आज गणेशची कृती महत्त्वाची वाटत होती. या छोट्याशा प्रसंगातून विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये आणि मूल्यशिक्षण कसे रुजते, हे स्पष्टपणे दिसून येते. गणेशने दाखवलेली कृती ही केवळ वीज बचतीपुरती मर्यादित नसून ती जबाबदारीची जाणीव, सजगता आणि योग्य वेळी निर्णय घेण्याची क्षमता यांचे उदाहरण आहे. अशा प्रसंगांमधून मुलांमध्ये स्वअनुशासन, सामाजिक भान आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याची सवय निर्माण होते. पुस्तकातील धडे प्रत्यक्ष कृतीत उतरले की ते अधिक प्रभावी ठरतात. याच प्रक्रियेतून मूल्य शिक्षण सहजपणे आत्मसात होते आणि विद्यार्थी केवळ ज्ञान मिळवणारे न राहता संवेदनशील, जबाबदार आणि जागरूक नागरिक बनू लागतात.

वीज बचत का महत्त्वाची? आजच्या जगात विजेची मागणी वाढली आहे परंतु संसाधने मर्यादित आहेत. एक छोटे बटण बंद केल्यानेही आपण वीज वाचवू शकतो. गणेशची ही कृती दाखवते की, आपल्या रोजच्या जीवनात साध्या प्रयत्नांनी आपण मोठा फरक निर्माण करू शकतो. लहान लहान निर्णय आपल्या जीवनात मोठा बदल घडवू शकतात.

सारे घडले ते अचानक होते. गणेशचे कौतुक वाटले. त्याला म्हणालो,

''भारी रे गणा ! तुला माहिती आहे का, तू फक्त बटण बंद केले नाही तर आम्हा सर्वांना एक महत्त्वाचा धडा दिला आहे बचतीचा.''

गणेश हसत म्हणाला, ''आपण लाईट वाचवायची सर, वाचलेली लाईट नंतर कामात पडती.''

गणाचं निरागस उत्तर जीवनात बचतीचे महत्त्व सांगून गेलं. पैशाची, वेळेची, विजेची किंवा साधनांची बचत ही आपल्या स्वतःच्या भविष्याची तयारी आहे. गणेशने दाखवले की, लहान पण नीट केलेले कार्य आपल्या आयुष्यात मोठा परिणाम घडवू शकतो.

इतर विद्यार्थ्यांनीही त्याच्या कृतीकडे लक्ष दिले. यावेळी पुन्हा मुलांना दैनंदिन जीवनात आपण काय बचत करू शकतो हे सांगता आले.

शाळा ही केवळ गणित, विज्ञान किंवा भाषा शिकवणारी जागा नसून, जीवनाच्या प्रत्येक पैलूवर धडे देणारी जागा आहे. गणेशसारख्या विद्यार्थ्यांच्या कृतीमुळे इतर मुलांनाही प्रेरणा मिळते. साध्या कृतीतून मिळणारा संदेश इतका स्पष्ट आहे की, 'थोडे प्रयत्न करणे, छोटे निर्णय घेणे पण नीट आणि जबाबदारीने करणे हेच खरे मूल्य आहे.'

शाळेतल्या या छोट्या प्रसंगातून मला एक गोष्ट लक्षात आली. लहान पण नीट केलेली कृतीही मोठा बदल घडवू शकते. गणेशने फक्त बटण बंद केले पण त्याचा संदेश खूप मोठा होता. त्याची कृती सांगून गेली होती, 'बचत करा, जबाबदारी घ्या आणि आपल्या छोट्या प्रयत्नांनीही इतरांना प्रेरणा द्या!' आणि हाच एक सुंदर भाग आहे शाळेचा येथे आपण फक्त शिकत नाही तर जीवन जगण्याची कला, जबाबदारीची जाणीव आणि नीतीची शिकवण मिळते. गणेशची ही साधी कृती माझ्या शाळेच्या आठवणींचा एक सुंदर टप्पा आहे आणि हाच संदेश मी आयुष्यभर लक्षात ठेवणार आहे. जर आपण आपल्याभोवतीची साधने, उपकरणे आणि ऊर्जा योग्य पद्धतीने वापरली तर आपण फक्त शाळेतील वातावरण सुसंगत ठेवत नाही तर भविष्यासाठी जबाबदार नागरिकही तयार करतो. वर्गाच्या साध्या गोष्टींकडे लक्ष देणे, पंखा, लाईट किंवा उपकरणे योग्य पद्धतीने वापरणे या आपल्या जीवनातील साध्या पण महत्त्वाच्या सवयी आहेत.' शेवटी सांगायचं तर लहान गोष्टी करायला विसरू नका, त्यातच खरा मोठेपणा आहे. प्रत्येक छोट्या प्रयत्नातून आपल्याला आणि आपल्या सभोवतालच्या लोकांना फायदा होतो. हे बचतीचं धन मोलाचं आहे. लहान गोष्टी दुर्लक्ष करू नका कारण त्यातच मोठेपण दडलेले असते आणि हाच खरा जीवनाचा विजय आहे.

# अहंकाराच्या शिखरावर



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०



ओशोंच्या कथा

**माणसाची मूळ प्रवृत्ती कोणती? माणसाला जीवनात नेमके काय हवे आहे? माणसं जीवनभर जी धावाधाव करतात ती नेमकी कशासाठी? मुळात आपल्याला कोणीतरी चांगले म्हणावे, या चांगुलपणाच्या भावनेत देखील अहंकाराचा वारा आहे. आपण जे काही चांगले वागतो ते चांगले वर्तन हे माणसांचे बाह्य आणि अंतर्वर्तन आहे का? मुळात ते नाहीच. मानसशास्त्रज्ञ देखील तेच सांगत आले आहेत. मुळची प्रवृत्ती काही असली तरी त्या चांगुलपणात अनेकदा अहंकाराचा वारा असतो. प्रत्येकालाच आपण चांगले वागावे असे वाटत नाही पण कोणी तरी चांगले म्हणावे म्हणून माणसं चांगली वागत असतात हे मात्र खरे... त्या चांगले म्हणण्याच्या वृत्तीतही अहंकाराचेच पोषण असते. आपल्या अहंकाराचे भरण चांगले व्हावे याकरिता माणसं आपला मुळचा स्वभाव बदलतात हे खरे.**

ओशो एक गोष्ट सांगतात. एका गावात एक धनिक राहत होता. त्याला एक दिवस असे वाटले की, आपण आपल्या माणसांना छानशी भोजनाची मेजवानी द्यावी. त्यासाठी त्यांनी एक कारणही शोधले आणि त्या विशेष कारणानिमित्त आपल्या अगदी जवळच्या मित्रमंडळींना अत्यंत सुंदर मेजवानी दिली. आपल्या राज्यातील एक धनिक आता मेजवानी देतो आहे म्हटल्यावर सर्वच निमंत्रीत आले होते. धनिकाने आपल्या राज्याचा जो राजा होता, त्यालाही मेजवानीचे निमंत्रण दिले होते. मुळात राजाला निमंत्रण देणे हा जसा अहंकार होता, त्याप्रमाणे आपल्या मेजवानीला राजाने येणे यातही त्याची प्रतिष्ठा उंचावणार होती. त्या उंचावणाऱ्या प्रतिष्ठेत अहंकाराचे पोषण होणार होते. राजाला निमंत्रण गेले असल्याने राजा देखील मेजवानीसाठी उपस्थित राहिला होता. त्यामुळे धनिक अगदी बेहद्द खूश होता. इतकी सारी मंडळी आपल्या निमंत्रणाला मान देऊन आली याचा त्याला आनंद होता.

मेजवानीला सुरूवात झाली होती. धनिक येणाऱ्या जाणाऱ्याचे स्वागत करत होते. हास्यवदनाने हे घडत होते. सहभागी लोक मेजवानीसाठी बसले होते. पंगती उठत होत्या. सेवेकरी पंगतीत वाढत होते. गरमागरम आणि चविष्ठ मेनूवर निमंत्रित ताव मारत होते. धनिक जेवणाच्या पंक्तित फिरत होते परंतु पाहुणे मंडळी भोजनाला बसले असताना त्या धनिकाच्या आनंदाचे रूपांतर क्रोधात झाले. अचानक झालेल्या या बदलाचे आश्चर्य वाटत होते. खरं तर धनिकाचे सारे सेवक सेवा करण्यात गुंतलेले होते मात्र धनिकाचा पारा चढला होता. अनेकांना कळेना काय झाले आहे. येथे एक घटना अचानक घडली होती आणि सारा माहोल बदलून गेला होता. एक सेवक भोजन पंक्तित वाढत असताना, एका नोकराच्या हातून धनिकाच्या पायावर गरम भोजनाची थाळी पडली. धनिकाचा पाय भाजला होता. त्यामुळे धनिकाच्या संतापाच्या लाटा उसळल्या होत्या. त्याच्या डोळ्यातून आग उसळावी असेच चित्र होते. हा अवतार पाहिल्यावर नोकराचे काही खरे नाही असेच अनेकांना वाटू लागले. ज्याच्याकडून चूक घडली होती, तो नोकर तर घाबरला होताच पण इतर नोकही भयभीत झाले होते.

धनिकाचा पारा चढल्याने ज्याच्याकडून चूक झाली त्याला सारे ब्रह्मांड आठवले होते. आपला जीव वाचायला हवा म्हणून त्या नोकराने धर्मग्रंथातील एक वचन धनिकाला सांगितले. तो म्हणाला, 'जो क्रोधावर संयम ठेवतो तो स्वर्गाचा मालक बनतो!' मालकानं हे वाक्य ऐकलं. त्याच्या डोळ्यात क्रोधाग्नी उसळत होता. तरी त्यानं राग आवरला आणि तो म्हणाला, ''छे, मी काही रागावलो नव्हतो.''

धर्म ग्रंथाचे वाक्य होते... आणि मेजवानीला इतके लोक निमंत्रित होते. त्यामुळे अति राग करून चालणार नव्हता. त्याचवेळी धर्मग्रंथातील एक सुवचनही मदतीला आले होते. हे सुवचन ऐकून तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी टाळ्या वाजविल्या. खुद्द राजाने देखील धनिकाचे कौतुक केले. धनिकाच्या डोळ्यातल्या क्रोधाची जागा अभिमानाने घेतली होती. तो गौरवला गेला होता. एका धर्मवाक्याने त्याच्या जीवनाची वाट बदलली होती. आता वातावरण बदलले होते. त्यामुळे ज्याच्याकडून चूक घडली होती तो नोकर पुन्हा उद्गारला, ''जो क्षमा करतो तो स्वर्गाचा मालक बनतो.''

ते ऐकताच मालक त्याला म्हणाला, ''मी तुला क्षमा केली आहे'' कारण धनिकालाही स्वर्गाचा मालक बनायचे होते. खरं तर हे सुवचन ऐकून त्याला काय वाटले माहीत नव्हते कारण अहंकाराने भरलेल्या धनिकाच्या डोळ्यात क्षमेला जागा कुठली? पण क्षमा केल्यामुळे देखील अहंकाराचे भरण होते हे लक्षात घ्यायला हवे. अहंकाराचा मार्ग खूप सूक्ष्म असतो. छोट्या छोट्या गोष्टी माणसाच्या आयुष्यात अहंकाराचे भरण करत असतात. आता पाहुण्यांच्या दृष्टीला धनिक एक अत्यंत धार्मिक माणूस दिसू लागला होता. आतापर्यंत एक क्रूर शोषक असेच सारे जण त्याला ओळखत होते परंतु धनिकाचं हे नवे रूप पाहून सारी मंडळी चकित झाली. समोर बसलेल्या राजाने देखील धनिकाकडे असे पाहिले, की जणू कोणी आपल्यापेक्षाही श्रेष्ठ व्यक्तिकडे पाहत असावा.

राजाच्या कौतुकाच्या दृष्टीने धनपती आता जणू पृथ्वीतलावर नव्हताच. त्याच्या अंहकाराने आकाशाला गवसणी घातली होती. त्याचा हा चांगुलपणाचा अहंकार अधिकाधिक बलिष्ठ होत चालला होता. त्यामुळे नोकर अधिक खूश होता. ते पाहून नोकरानं धर्मग्रंथातलं अर्ध सुभाषित पुरे केले. तो पुढ जाऊन धनिकाला म्हणाला, ''दयाळू माणसावर परमात्मा प्रेम करतो.''

हे ऐकल्यावर धनिकाने नजर चारी दिशांना फिरविली. लौकिक, ऐहिक लोभ सदाच त्याच्या दृष्टीत भरलेला असायचा. आता तोच ऐहिक लोभ पारलौकिक बनला होता. धनिक नोकराला म्हणाला, ''जा, आजपर्यंत तू माझा गुलाम होतास पण आता या गुलामगिरीतून तुला कायमचे मुक्त केले आहे.''

त्याच वेळी नोकराच्या तोंडून निघालेल्या धर्म-सुवचनाने धनिकाच्या अहंकाराचे भरण झाल्यामुळे सुवर्ण-मुद्रांनी भरलेली एक थैली त्याने नोकराला दिली. धनिकाच्या मनातील क्रोधाचे रूपांतर आता अहंकारात झाले होते. आता त्या क्रोधाचे रूपांतर लोभात झाले होते. क्रोध, लोभ, घृणा, भय हे सर्व म्हणजे एकाच शक्तीच्या अभिव्यक्ति सामावलेले नव्हेत काय? धर्म जर इतका स्वस्त असेल तर कोणता धनिक तो खरेदी केल्याशिवाय राहील? भय आणि लोभ या दोन खांबांच्या आधारावर धर्म उभा नाही काय? मी म्हणतो मग अधर्माचे आधारस्तंभ कोणते असतात? धर्ममंदिराच्या शिखरावर देखील अहंकार असतो ना? मी विचारतो, मग धर्म-मंदिराचे शिखर कोणते आहे? ओशोच्या या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवी यात शंका नाही मात्र या प्रश्नांचा शोध घेताना एक गोष्ट निश्चित लक्षात येते की, माणसाच्या अहंकाराचे भरण होण्यासाठी माणूस चांगले वागू शकतो. चांगले वर्तन हे मुळचे वर्तन नाही, तर जे काही वर्तन चांगले दिसते आहे, ते स्वतःच्या सुप्त अहंकाराचे भरण व्हावे याकरिताचे असते.

आपल्या आयुष्यात जेव्हा वर्तन अहंकारशून्य होते तेव्हा आपली माणूस बनण्याची प्रक्रिया सुरू झाली असे समजावे. ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा जो भाव आहे, तो प्रतिबिंबीत होण्यासाठी अहंकाराचा कोणताच वारा लागता कामा नये याची काळजी घेतली जायला हवी. अर्थात ही वाट वाटते तितकी सोपी नाही हे खरेच... कारण या वाटेचा प्रवास घडवण्यासाठी अहंकारच आडवा येत असतो पण प्रयत्न करून पाहण्यास काय हरकत आहे?

# खडूने रेखाटलेलं आयुष्य

**शाळेचे दिवस म्हणजे आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर, निरागस आणि गोड आठवणींनी भरलेला काळ. त्या दिवसात फक्त अभ्यासाची पाने नव्हती तर प्रत्येक क्षणात जीवनाची नवी शिकवण दडलेली होती. वार्षिक स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव, शालेय सहली, सांस्कृतिक कार्यक्रम या सगळ्या अनुभवांनी आयुष्याला रंगतदार छटा दिल्या. शाळा म्हणजे केवळ पुस्तकांचं ओझं नव्हतं तर अनुभवांची खणखणीत शिदोरी होती.**



मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४

त्या आठवणींमध्ये एक क्षण असा आहे, जो माझ्या मनात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. फळ्यावर सुविचार लिहिण्याची संधी. माझं स्वच्छ, सरळ आणि सुंदर हस्ताक्षर पाहून शिक्षकांनी मला ती जबाबदारी दिली होती. रोज सकाळी शाळा सुरू होण्याआधी मी फळ्यासमोर उभा राहायचो. खडूचा पहिला स्पर्श जसा फळ्यावर उमटायचा, तसं मनात एक वेगळंच विश्व फुलायचं.

'विद्या हीच खरी संपत्ती आहे, कष्टाशिवाय फळ नाही, सत्कर्म हेच जीवनाचं सौंदर्य आहे' असे सुविचार जेव्हा माझ्या अक्षरांतून फळ्यावर उमटायचे तेव्हा त्या पांढऱ्या ओळी मला एखाद्या रांगोळीसारख्या भासत. प्रत्येक अक्षराला तोलामोलाची सुंदरता द्यायची इच्छा असायची. फळा सजला की मनही सजून जायचं. सकाळी मित्रमंडळी वर्गात येताच त्यांच्या नजरा फळ्याकडे वळायच्या. कधी एखादा मित्र किंवा शिक्षक माझ्याकडे बघून म्हणत, ''वा! किती सुंदर लिहिलंयस!'' त्या क्षणी मनात जी गोड भावना निर्माण व्हायची, ती शब्दांत सांगणं कठीण आहे. ही कौतुकाची थाप मला रोज नव्यानं उभारी द्यायची.

कधी शिक्षक एखादा प्रेरणादायी विचार सांगायचे तर कधी मी पुस्तकात वाचलेलं सुंदर वाक्य निवडून फळ्यावर लिहायचो. माझ्यासाठी ते फक्त अक्षर उमटवणं नव्हतं तर प्रत्येक शब्द मनापासून जगणं होतं. हळूहळू उमगायला लागलं की सुविचार म्हणजे केवळ शब्दांची माळ नाही तर जीवनाचे खरे धडे आहेत.

त्या छोट्याशा जबाबदारीने मला खूप काही दिलं. शिस्त, जबाबदारी, सौंदर्यदृष्टी, विचारांना आकार देण्याची ताकद. खडूचा गंध, फळ्यावर उमटणाऱ्या रेषा आणि त्या अक्षरांचा अभिमान हे सगळं आजही मनात जिवंत आहे. शाळेतील त्या सुविचारांनी मला अक्षरकलेचा आनंद तर दिलाच पण जीवन जगण्याचा खरा अर्थही शिकवला.

शाळेच्या निरागस दिवसांतलं ते सुवर्णपर्ण आजही मनात उलगडतं. काळाच्या प्रवाहात ती रम्य सकाळ दूर गेली असली तरी त्या आठवणींचा सुगंध अजूनही हृदयात दरवळतो. फळ्यावरची अक्षरे जरी पुसली गेली असली तरी त्यातील मौल्यवान विचारांची बीजे मनाच्या गाभाऱ्यात खोलवर रुजली आहेत. जीवनाच्या प्रत्येक नव्या वाटेवर पाऊल ठेवताना, तीच आठवण मला एखाद्या दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरते. खडूचा ठसा क्षणिक होता पण त्या विचारांचा ठसा आयुष्यभर टिकून राहिला.

एखाद्या गोष्टीला सुंदरतेने, निष्ठेने आणि प्रेमाने केलं तर ती छोटीशी कृती देखील आयुष्याला अर्थ देऊ शकते, हे मला त्या सुविचारांनी शिकवलं. आज जेव्हा मी मागे वळून पाहतो तेव्हा मनापासून जाणवतं - त्या छोट्याशा संधीने फक्त शाळेचा फळा सजवला नाही तर माझं आयुष्य घडवलं.

प्रति,

८

सोमवार, दि. २७ एप्रिल ते ३ मे २०२६

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979

**लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ**

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा.

**भ्रमणध्वनी :** ७०५७२९२०९२/८७६७९४१८५० **ई मेल :** info@chaprak.com

# भोसले यांनी महाराष्ट्राची श्रवणसंस्कृती श्रीमंत केली : जोशी

**पुणे, (प्रतिनिधी) :** प्राचार्य शिवाजीराव भोसले हे महाराष्ट्राचे संस्कारपीठ होते. महाराष्ट्रातील पाच पिढ्यांचे मन आणि कान त्यांच्या वक्तृत्वामुळे तयार झाले. भाषेचे सौंदर्य, कल्पनेचे वैभव आणि उदात्त विचारांचे दर्शन त्यांच्या व्याख्यानातून घडत असे. महाराष्ट्राचे समाजमानस घडविण्याचे काम त्यांनी केले. प्राचार्य भोसले यांचे वक्तृत्व हे मराठी वक्तृत्वाचा मानबिंदू आहे. त्यांनी महाराष्ट्राची श्रवण संस्कृती श्रीमंत केली, असे मत प्रसिद्ध लेखक आणि व्याख्याते प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

वसंत व्याख्यानमालेत प्रा. जोशी यांनी 'प्राचार्य शिवाजीराव भोसले : व्यक्ती आणि वक्तृत्व' या विषयावर कै. सारंग साठे स्मृती व्याख्यानाचे पुष्प गुंफले. प्राचार्य भोसले यांच्या जन्मशताब्दीला लवकरच सुरुवात होणार असून त्यानिमित्त या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानाला मोठा प्रतिसाद मिळाला. वक्तृत्वोत्तेजक सभेच्या उपाध्यक्ष सरिता साठे यावेळी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन प्रा. जोशी यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा जोशी म्हणाले, प्राचार्य भोसले हे विचारांचा अखंड ठेवणारा नंदादीप होते. मरगळलेल्या मनाला नवचैतन्य देण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारात, वक्तृत्वात आणि जीवनविषयक तत्त्वज्ञानात होते म्हणून श्रोते मोठ्या आस्थेने त्यांच्या व्याख्यानाला गर्दी करत. महापुरुषांच्या जीवनचरित्राचे निमित्त करून त्यांनी उगवत्या पिढीच्या उमलत्या बुद्धीभोवती विचारांची आरास मांडली. त्यांच्या भाषणांनी माणसे केवळ भारावून गेली नाहीत किंवा पेटून उठली नाहीत तर ती अंतर्मुख होऊन विचार करायला लागली हे त्यांच्या वक्तृत्वाचे वेगळेपण होते. श्रोत्यांचे मनोरंजन हा त्यांच्या वक्तृत्वाचा कुलाचार कधीच नव्हता. त्यांनी आपल्या भाषणातून श्रोत्यांना प्रबोधनाच्या प्रकाशवाटा दाखविल्या. शब्द, विचार आणि लय यांच्या माध्यमातून प्राचार्य भोसले विचारांची एक दीपमाळ श्रोत्यांच्या समोर प्रज्वलित करत आणि जाणकार श्रोते आपल्या ज्ञानपणत्या पेटवून ज्ञानाचा दीपोत्सव साजरा करत. बोलणे हा केवळ जगाच्या व्यवहारातील एक उपचाराचा भाग नाही तर बोलण्यातून भाषा साहित्य, समीक्षा आणि संस्कृती यांचे जतन आणि संवर्धन होत असते म्हणून वाचिक अभिव्यक्तीची गांभीर्याने उपासना करायला हवी.

प्रारंभी कै. सारंग साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. वक्तृत्वोत्तेजक सभेच्या कार्यकारणीचे सदस्य स्वप्नील पोरे यांनी स्वागत केले व आभार मानले.





### पिसारा फार काळ फुलवून ठेवता येत नाही

प्राचार्य भोसले यांच्या ओघवत्या वक्तृत्वामुळे सुरुवातीच्या काळात हे पाठांतरच आहे असे अनेकांना वाटायचे. पुण्यात 'सोबत'कार ग. वा. बेहेरे यांनी भोसले यांची परीक्षा घ्यायचे ठरविले. पुण्यात एका संस्थेने बेहेरे यांचे स्वातंत्र्यवीर सावरकरांवर व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य भोसले होते. समारंभ सुरू होताच बेहेरे म्हणाले, आज मी सावरकरांवर बोलण्यासाठी आलो आहे पण माझी तब्येत बरी नाही त्यामुळे आज प्राचार्य भोसले सावरकरांवर बोलतील, आवश्यकता वाटल्यास मी समारोप करेन. थोडेही विचलित न होता प्राचार्य भोसले बोलायला उभे राहिले आणि त्यांनी दोन तास सावरकरांवर व्याख्यान दिले. अध्यक्षीय समारोप करताना बेहरे म्हणाले, शिवाजीरावांची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने मी हा बदल केला होता. शिवाजीरावांचे मोठेपण मान्यच करावे लागेल. पिसारा फार काळ फुलवून ठेवता येत नाही. मूळ काया आणि तिचे अंतरंग हेच खरे असतात.

### तत्त्वनिष्ठा त्यांनी कायम जपली

प्राचार्य भोसले यांचे अमोघ वक्तृत्व आणि त्यांची प्रचंड लोकप्रियता यामुळे त्यांनी राजकारणात यावे यासाठी सर्व राजकीय पक्षांकडून विपुल प्रयत्न झाले. खुद्द यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा वेध घेण्याचा अनेकदा प्रयत्न केला पण प्राचार्य भोसले राजकारणात न जाण्याच्या आपल्या निर्णयावर ठाम राहिले. भोसले यांचे बंधू बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना प्राचार्यांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार जाहीर झाला. आपले बंधू मुख्यमंत्री असताना हा पुरस्कार स्वीकारणे त्यांना प्रशस्त वाटले नाही. त्या समारंभाला प्राचार्य अनुपस्थित राहिले. बंधू मुख्यमंत्री असताना ते एकदाही मंत्रालयात गेले नाहीत. ही तत्त्वनिष्ठा त्यांनी कायम जपली.

### २८ वर्षे विविध विषयांवर व्याख्याने

पुण्याची वसंत व्याख्यानमाला आणि प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे अतूट नाते होते. वसंत व्याख्यानमालेच्या १५१ वर्षांच्या इतिहासात सलग २८ वर्षे विविध विषयांवर व्याख्याने देण्याचा विक्रम करणारे प्राचार्य शिवाजीराव भोसले हे एकमेव वक्ते आहेत.

# पुस्तकमित्र : वाचनातून घडणारी समृद्ध आणि संवेदनशील पिढी




**सौ. संजना मगर**

९८९०७२२८६७

**आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात वाचनाची सवय कमी होत चालली आहे. मोबाईल आणि स्क्रीनच्या आकर्षणात पुस्तकांपासून दूर जात असलेल्या पिढीला पुन्हा वाचनाकडे वळवण्याचा एक सुंदर आणि प्रेरणादायी प्रयत्न म्हणजे 'पुस्तकमित्र' हा उपक्रम होय.**

या उपक्रमामागे आहे, एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व चि. तनय मगर. केवळ वयाच्या १२व्या वर्षी वाचनाचे शतक पूर्ण करणाऱ्या तनयने अनेक मराठी आणि इंग्रजी पुस्तकांचे अवांतर वाचन केले आहे. त्याच्या या वाचनप्रेमातूनच इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने त्याने 'पुस्तकमित्र' ग्रुपची सुरुवात केली. तो ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी येथे इयत्ता सातवीमध्ये घरकुल विभागात शिक्षण घेत आहे. चि. तनय मगर आणि कु. रमैनी डिंगोरे, महात्मा गांधी विद्यालय, मंचर, इयत्ता सहावी ही वाचनप्रेमी विद्यार्थिनी यांच्या पुढाकारातून आज त्यांच्याच वयोगटातील मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांना 'गुगल मिट'च्या माध्यमातून एकत्र आणले गेले आहे. दररोज संध्याकाळी ८.३० ते ९.०० या वेळेत होणाऱ्या या उपक्रमात २५ मिनिटे वाचन आणि ५ मिनिटे चिंतन/विश्लेषण केले जाते. या साध्या पण परिणामकारक पद्धतीमुळे वाचन केवळ सवय न राहता मुलांना एक रोमांचकारी अनुभव बनतो. पुस्तकमित्रचा मुख्य उद्देश म्हणजे वाचनाची गोडी निर्माण करणे, भाषाशैली व शुद्धलेखन सुधारणे तसेच मुलांमध्ये आत्मविश्वास आणि संवादकौशल्य वाढवणे असा आहे. या उपक्रमातून सहभागींची एकाग्रता वाढते, कल्पनाशक्ती फुलते, तणाव कमी होतो आणि नवे ज्ञान तसेच नवे दृष्टिकोन मिळतात. गटामध्ये बोलण्याचे धाडसही यामुळे विकसित होते. या उपक्रमात तनय व रमैनी बरोबरच आरोही खुडे, सार्थक हराळ, क्रिशला पवार, सौम्या पोखरकर, दिविज शिंदे, आराध्य कारले, निशिता कारले हे विद्यार्थी सुद्धा सक्रियपणे रोज सहभागी आहेत. तसेच मोठ्या गटामध्ये पर्णिका सावंत, निसर्ग मगर, अध्यापिका वैशाली हराळ,



डॉ. मेघना पोखरकर, प्रिया कारले, दीपाली शिंदे, लेखिका अस्मिता डिंगोरे, प्रियांका सावंत यासारखे वाचनप्रेमीही रोजच्या सत्रात सहभागी होतात.

संपूर्ण महाराष्ट्रातून मुलांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला आहे. विशेष म्हणजे दर रविवारी ही सर्व मुले एकत्र येऊन ऑनलाईन खेळ खेळतात. या उपक्रमांमुळे त्यांची बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि एकमेकांना समजून घेण्याची व सामावून घेण्याची क्षमता अधिक दृढ झाली आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये हा उपक्रम मुलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, त्यांचा वेळ अधिक सर्जनशील आणि अर्थपूर्ण बनवत आहेत. यामध्ये विविध लेखकांनीही आपली उपस्थिती दर्शवून मुलांना मार्गदर्शन केले आहे, ज्यामुळे वाचनाचा अनुभव अधिक समृद्ध झाला आहे. वयाच्या पंधराव्या वर्षी चि. तनयने आपल्या घरातील ग्रंथालय शाळेतील तसेच आजबाजूच्या परिसरातील मुलांना उपलब्ध करून दिले आहे. या ग्रंथालयात ३०० हून अधिक वाचनाची पुस्तके आहेत. पुस्तकमित्र हा ग्रुप फक्त वाचनसत्रासाठी मर्यादित न राहता पुस्तकमित्रने एक पाऊल पुढे टाकत १ डिसेंबर २०२५ रोजी प्रकाशन क्षेत्रात 'पुस्तकमित्र प्रकाशन' या नावाने पदार्पण केले असून पुस्तकमित्र प्रकाशनतर्फे ८ डिसेंबर रोजी माझा 'चांदण्यांच्या ओंजळीत' हा काव्यसंग्रह श्री. जगदाळे यांच्या सहकार्याने विश्वास पाटील आणि प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते प्रकाशित केला. 'अभी अनू, गोष्ट तिची अन् त्याची' ही कादंबरी ४ जानेवारी २०२६ रोजी ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा येथे प्रकाशित केली आहे.